# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ/७३१/२०२४/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| श्री. हरी प्रताप गिरी | सहाय्यक संचालक (तांत्रिक विभाग), पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे | व्यवस्थापकीय संचालक, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे |

**(सुनावणी दिनांक- २४/०७/२०२५)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. २३/०१/२०२४ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये जाणूनबुजून व हेतुपुरस्सर माहिती देण्यास टाळाटाळ केली, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी विद्यमान जन माहिती अधिकारी, हजर आहेत. अपिलार्थी गैरहजर आहेत परंतु त्यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगाकडे सादर केले आहे.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानुसार खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| २८/०८/२०२३ | दि. ०७/१२/२०२१ या तारखेला महाराष्ट्र शासन, कृषि पशुसंवर्धन दुगधव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, शासन निर्णय क्रमांक पविआ १०२० प्र.क. ११० पदुम-३ मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई दि. २५ मे २०२१ नुसार ऑनलाईन अर्ज क्र. एम.एम. २६६०२९३३५२ या अर्ज राज्यस्तरीय योजना शेळी मेंढी गट वाटप करण्यासंबंधित कार्यालयाकडे अर्ज सादर केलेले आहेत. संबंधित कार्यालयाकडून माझ्या अर्जावर आजपर्यंत कोणतेही समाधानकारक कारवाई करण्यात आली नाही याबाबत १ ते ७ मुद्यांची माहिती |

अपिलार्थी यांनी निवेदनात, "अर्जानुसार प्रमाणित प्रती माहिती विनामूल्य देण्याचे आदेश पारित करावे, संबंधित अधिकारी यांचेवर शिस्तभंग कार्यवाही करण्याबाबत शिफारस करावी." असे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, तांत्रिक विभाग, पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळ, पुणे यांनी दि. १०/१०/२०२३ रोजी माहिती अर्ज पशुसंवर्धन आयुक्तालयास हस्तांतरण केल्याचे तसेच पशुसंवर्धन आयुक्तालयाने सदर माहिती अर्ज जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,

छत्रपती संभाजीनगर तसेच जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे दि. २६/१०/२०२३ रोजी हस्तांतरीत केला होता. त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर दि. ०८/११/२०२३ रोजीच्या पत्राने अपिलार्थीस माहिती दिली आहे. तसा पुरावा ही आयोगासमोर सादर केला.

उपलब्ध अभिलेखावरुन अपिलार्थीस दि. ०८/११/२०२३ रोजीच्या पत्राने माहिती दिल्याचे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणी, अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले आहे. सबब, आयोग खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जावक क्र.रामाआ /७३१/२०२४/पुणे 10272/2025 दिनांक - 26/11/25